# अंबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ

सुधारित बांधकाम परवानगी

जावक क्रमांक /अं.न.प./नरवि/बां.प./११-१२/१३३४/२०१०/१३८
अंबरनाथ नगरपरिषद कार्यालय,
अंबरनाथ. दिनांक : ६।३।२०१२

प्रति,

श्री.अरुण वसंत कारखानीस,श्री.प्रिती यशवंत चिटणीस,श्रीम.वृंदा कारखानीस,
श्री.सुधिर वसंत निंबाळकर,श्री.जयंत वसंत निंबाळकर यांचे कु.मु.प.धा.
मे.ओंकार कन्स्ट्रक्शनचे भागीदार श्री.विकास कानडे,श्री.बाळू करलग
व्दारा : श्री.प्रमोद व्ही.पाटील,इंजिनिअर,अंबरनाथ

विषय : मौजे : मोरीवली ,तहसील - अंबरनाथ, येथील,गट क्र.४६/३ पै.भूखंड क्र.८ व ९
येथे बांधकाम करण्याच्या मंजूरी बाबत.
संदर्भ : आपला दि.२३/१/२०१२ चा अर्ज क्र.१२०००१३३६

व्दारा : श्री.प्रमोद व्ही.पाटील,इंजिनिअर,अंबरनाथ

यांचे मार्फत सादर केलेला अर्ज. महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ४५ अन्वये.
मौजे : मोरीवली ,तहसील - अंबरनाथ, येथील,गट क्र.४६/३ पै.,भूखंड क्र.८ व ९
क्षेत्र : ७२६.६० चौ.मी.येथे बांधकाम करण्याच्या मंजूरी बाबत. भूखंडाच्या विकास करावयास महाराष्ट्र नगरपरिषद अधिनियम १९६५ चे कलम १८९ अन्वये बांधकाम करण्यासाठी केलेल्या दिनांक २३/१/२०१२ च्या अर्जास अनुसरुन पुढील शर्तीस अधिन राहून तुमच्या मालकीच्या जागेत हिरव्या रंगाने दुरुस्ती दाखविल्याप्रमाणे,तळमजला रहाणेसाठी,दुकान,वाडे भिंतीच्या इमारतीच्या बांधकामाबाबत, बांधकाम परवाना/प्रारंभ प्रमाण पत्र देण्यात येत आहे.

सुधारित बांधकाम परवानगी

-: अटी : -

१. ही बांधकाम परवानगी दिलेल्या तारखेपासून एक वर्ष पर्यत वैध असेल, नंतर पुढील वर्षासाठी परवानगीचे नूतनीकरण मुदत संपणे आधी करणे आवश्यक राहील. अशाप्रकारचे नूतनीकरण फक्त तीन वर्ष करता येईल. वैध मुदतीत बांधकाम पुर्ण करणे आवश्यक आहे. नूतनीकरण करताना किंवा नवीन परवानगी घेतांना त्यावेळी अस्तित्वात आलेल्या नियमाचा व नियोजित विकास आराखडयाच्या अनुशंगाने छाननी करण्यात येईल.
२. नकाशात------------------ रंगाने केलेल्या दुरुस्त्या आपल्यावर बंधनकारक राहतील.
३. मे.जिल्हाधिकारी ठाणे, यांजकडून बांधकाम चालू करावयाचे अगोदर बिनशेती परवानगी घेण्याची जबाबदारी तुमच्यावर राहील व बिनशेतीच्या परवानगीची एक सत्य प्रत काम सुरु करावयाचे पंधरा (१५) दिवस अगोदर नगरपरिषदेकडे पाठविणे आवश्यक राहिल.
४. बांधकाम चालू करण्यापूर्वी (७) दिवस आधी नगरपरिषद कार्यालयास लेखी कळविण्यात यावे.
५. ही परवानगी आपल्या मालकीच्या कबजातील जमिनी व्यतिरिक्त जमिनीवर बांधकाम अगर विकास करण्यास हक्क देत नाही.
६. बांधकाम सोबतच्या मंजूर केलेल्या नकाशाप्रमाणे आणि घालून दिलेल्या अटी प्रमाणे करता येईल.जोत्यापर्यत बांधकाम झाल्यानंतर वास्तुशिल्पकाराचे, मंजूर नकाशाप्रमाणे बांधकाम केल्या बाबतचे प्रमाणपत्र नगरपरिषदेस सादर करण्यात यावे त्यानंतरच जोत्यावरील बांधकाम करावे.
७. भूखंडाचे हद्दीत भोवती मोकळा सोडावयाच्या जागेत बदल करु नये व त्यामध्ये कोणत्याही प्रकारचे बांधकाम करु नये.
८. बांधकामात कोणत्याही प्रकारचा फेरफार पूर्व परवानगी घेतल्याशिवाय करु नये. तसे केल्याचे आढळून आल्यास सदरची बांधकाम परवानगी रद्द झाली असे समजण्यात येईल.
९. इमारतीच्या बांधकामाच्या सुरक्षिततेची हमी (स्ट्रक्चरल सेफ्टी) जबाबदारी सर्वस्वी आपल्या वास्तुशिल्पकार व स्थापत्य विशारद यांचेवर राहील.